# तीन दिवसांत आकारी पडीत जमिनीचा निर्णय न झाल्यास ‘जमीन कब्जा’ आंदोलन

## हजारो शेतकरी ट्रॅक्टर रॅलीत सहभागी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडीत जमिनी मूळ मालक व वारसांना परत मिळाव्यात, या मागणीसाठी हरेगाव शेती महामंडळ कार्यालयासमोर आकारी पडीत शेतकऱ्यांनी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आकारी पडीत शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने ट्रॅक्टरसह रॅली काढत शासनाचे लक्ष वेधले. तीन दिवसांत जमिनीबाबत ठोस निर्णय न झाल्यास जमीन कब्जा आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी दिला.

हरेगाव, उंदीरगाव, ब्राह्मणगाव, माळवाडगाव परिसरातील शेतकरी ट्रॅक्टर रॅलीद्वारे श्रीरामपूर येथे दाखल झाले. महात्मा गांधी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर रॅली हरेगाव मळा, ब्राह्मणगाव फाटामार्गे शेती महामंडळ कार्यालयापर्यंत काढण्यात आली. यावेळी महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

श्रीरामपूर तालुक्यात ब्रिटिशकालीन सुमारे ७५०० आकारी पडीत जमिनींचा प्रश्न प्रलंबित आहे. उच्च न्यायालयाचा अनुकूल निकाल आणि शासनाची मान्यता मिळून दोन वर्षे उलटली असतानाही मूळ मालक व वारसांना जमिनींचे प्रत्यक्ष वाटप झालेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

ॲड. अजित काळे म्हणाले, या जमिनी ब्रिटिश शासनाने १९१८ मध्ये ऊस उत्पादनासाठी घेतल्या होत्या. तीस वर्षांसाठी घेतलेल्या जमिनींना आज १०७ वर्षे झाली आहेत. उच्च न्यायालयाचा निकाल झाल्यानंतरही शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी मिळत नाहीत, हे दुर्दैवी आहे. सरकारला कायद्यात दुरुस्ती करायची असेल तर ती करावी; मात्र शेतकऱ्यांच्या जमिनी परत द्याव्यात.

शासनाला तीन दिवसांची मुदत देत आहोत. या कालावधीत निर्णय न झाल्यास प्रत्येक गावात जमीन कब्जा आंदोलन करण्यात येईल. एकही जमिनीचा तुकडा शिल्लक ठेवणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. आंदोलनादरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी शासनाची राहील, असेही काळे यांनी सांगितले.




यावेळी माजी प्रदेशाध्यक्ष लक्ष्मणराव वडले, रुपेश काळे, साहेबराव चोरमल, शरद आसने, सचिन वेताळ, बाबासाहेब वेताळ, बाळासाहेब बकाल, सोपान नाईक, ॲड. प्रशांत कापसे, मेजर काळे, सागर गिऱ्हे, सतीश नाईक, बबन नाईक, राजेंद्र नाईक आदींची भाषणे झाली. तीन दिवस अन्नत्याग आंदोलन सुरू राहणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### तिरंगा रॅलीतून विकसित राष्ट्रनिर्मितीचा संकल्प : ना. विखे पाटील

करताना विखे पाटील म्हणाले की, ‘वंदे मातरम्’ या ऐतिहासिक गीताला १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून ‘वंदे मातरम्’चे गायन करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे. ‘वंदे मातरम’ हे केवळ गीत नसून मातृभूमीप्रती असलेले प्रेम, त्याग आणि समर्पणाची भावना आहे. स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारक आणि स्वातंत्र्यसैनिकांना एका सूत्रात बांधण्याचे काम या गीताने केले. शासकीय तसेच सार्वजनिक कार्यक्रमांची सुरुवात ‘वंदे मातरम्’ने करण्याचा निर्णय राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करणारा आणि देशाच्या समृद्ध इतिहासाची प्रेरणा देणारा असल्याचेही विखे पाटील यांनी सांगितले. तिरंगा रॅलीच्या निमित्ताने भाजप कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत देशाच्या एकता, अखंडता आणि विकासाचा संदेश दिला. रॅलीदरम्यान निर्माण झालेल्या देशभक्तीपूर्ण वातावरणामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले.

### कल्पना खरात शिर्डी पोलीसांत हजर, मी नाही त्यातली म्हणत जबाब नोंदवला

व्यवहारातील सर्व निर्णय आणि प्रक्रिया अशोक खरात यांनीच पार पाडल्याचे तिने सांगितल्याची माहिती समोर आली आहे. तसेच या व्यवहाराशी संबंधित कोणत्याही व्यक्तीला आपण ओळखत नसल्याचेही तिने जबाबात नमूद केले आहे. काय आहे प्रकरण? शिर्डीलगतच्या निघोज परिसरातील गट क्रमांक १०६/२ मधील सुमारे चार एकर जमीन खरेदीत फसवणूक आणि आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करत शेतकरी रावसाहेब गोंदकर यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. प्राथमिक तपासानंतर पोलिसांनी भोंदूबाबा अशोक एकनाथ खरात, कल्पना अशोक खरात यांच्यासह अन्य काही जणांविरुद्ध सावकारीसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला होता. आरोपींनी संगनमत करून जमीन व्यवहार करताना आपली फसवणूक केल्याचा आरोप गोंदकर यांनी केला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अशोक खरात याला यापूर्वीच अटक करून त्याची चौकशी करण्यात आली आहे. तर कल्पना खरात यांनी राहाता न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, त्यावेळीही त्यांच्या वकिलांनी जमीन खरेदीत त्यांचा सहभाग नसल्याचा युक्तिवाद केला होता. दरम्यान, शिर्डी पोलिसांनी या प्रकरणाचा तपास पूर्ण करून राहाता न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. आता कल्पना खरात यांनी पोलिसांसमोर केलेले दावे आणि तपासादरम्यान उपलब्ध झालेले पुरावे यांची सांगड घालण्याचे आव्हान तपास यंत्रणेसमोर आहे. या व्यवहारात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता की त्या केवळ पतीच्या व्यवहारापासून अलिप्त होते, हे तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे.

### ५ वर्षात ३६ हजार कंपन्या बंद?

केंद्र सरकारकडून देण्यात आली. राज्यातील ३६,२११ कंपन्या बंद झाल्या वगैरे... काही नवख्या नेत्यांनी त्यासंदर्भात सोयीचा अर्थ काढून समाजमाध्यमांवर पोस्ट केल्या आणि काही माध्यमांनी त्याच्या बातम्या केल्या. पण, आपण कायम महाराष्ट्रहिताचा विचार करणारे सुजाण आणि ज्येष्ठ नेते आहात, त्यामुळे आपल्या मनात कोणता गैरसमज राहू नये, म्हणून हा थोडा विस्ताराने लेखनप्रपंच! मुळात एक लक्षात घेतले पाहिजे, ज्या कंपन्या बंद होतात, त्यातील ७६ टक्के या डिफंट कंपनी असतात. डिफंट म्हणजे डिसफंक्शनल, म्हणजे ज्या कधी सुरुच झाल्या नाहीत! आता ‘संसदेत विचारला प्रश्न आणि त्याचे उत्तर’ किंवा ‘माहिती अधिकारात विचारलेला प्रश्न आणि त्याचे उत्तर’ याचे एक प्रारुप ठरलेले असते. त्या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाली, तरच इतर तपशील मिळू शकतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात सुदैवाने संपूर्ण माहिती ही पारदर्शीपणे संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आपण कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या संकेतस्थळावर गेलात तर तेथे आपल्याला संपूर्ण माहिती प्राप्त होऊ शकते. ही माहिती देशातील प्रत्येक नागरिक, प्रत्येक माध्यमे पाहू शकतात. आणि मला सांगताना हेही आनंद होतो की, छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र क्रमांक १ वर होता आणि कायम क्रमांक १ वरच राहील.

# केवायसी करूनही ममदापुरचे शेतकरी मदतीपासून वंचित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ममदापूर :** मार्च मध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाकडून निधी मंजूर करण्यात आला. संबंधित शेतकऱ्यांनी आवश्यक केवायसी प्रक्रियाही पूर्ण केली, मात्र अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप मदतीची रक्कम जमा झालेली नसल्याची तक्रार समोर येत आहे. अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाल्यानंतर शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांना आता निधीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. निधी मंजूर होऊनही आणि केवायसी पूर्ण करूनही पैसे खात्यावर जमा होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत नेमकी कोणत्या कारणामुळे जमा झालेली नाही, याबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, तसेच प्रलंबित प्रकरणांची तातडीने तपासणी करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाईची रक्कम जमा करावी, अशी मागणी होत आहे. राहाता तालुक्यातील वंचित शेतकऱ्यांना अतिवृष्टी मदत कधी मिळणार? असा सवाल आता शेतकरी उपस्थित करत आहेत.

# ‘गोंधळ करू नका’ म्हटल्याच्या रागातून दाम्पत्याला मारहाण, सहा जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** घरासमोर सुरू असलेल्या बचत गटाच्या बैठकीदरम्यान मोठ्याने आरडाओरड होत असल्याने ‘गोंधळ करू नका’, असे सांगितल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून दाम्पत्याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी तसेच लोखंडी गजाने मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथे घडली. याप्रकरणी राणी सूर्यभान जाधव यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास राणी जाधव यांच्या घरासमोर शेजारी राहणाऱ्या अर्पिता सचिन डहाणे यांची बचत गटाची बैठक सुरू होती. बैठकीदरम्यान मोठ्याने आरडाओरड होत असल्याने राणी जाधव यांनी घरासमोर गोंधळ करू नका, असे सांगितले. याचा राग मनात धरून अर्पिता डहाणे यांनी वाद घालत शिवीगाळ केली.

त्यानंतर सचिन ज्ञानेश्वर डहाणे, कुणाल सचिन डहाणे, स्वरा सचिन डहाणे, अर्पिता सचिन डहाणे, अल्काबाई रोहिदास पवार आणि बेबी कचरू पवार यांनी राणी व त्यांचे पती सूर्यभान जाधव यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. यावेळी सचिन डहाणे याने लोखंडी गजाने राणी यांच्या उजव्या हातावर, तर सूर्यभान यांच्या हातावर, पायावर व डोक्यावर मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दाम्पत्याला जीवे मारण्याची धमकीही देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९०६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# नकाशात नाला दिसत होता, तरीही प्लॉटिंगला मंजुरी कशी?

## ‘सह्याद्री पार्क’ प्रकरणात प्रशासनाच्या पंचनाम्यानंतर नवा प्रश्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** पावसाळ्यात घराच्या दाराशी पाणी साचले, शेतात पाणी शिरले किंवा एखाद्या कुटुंबाचे घर पुराच्या पाण्याने वेढले, की आपण निसर्गाला दोष देतो. मात्र, पाण्याचा नैसर्गिक मार्गच माणसाने अडविला असेल तर? वैजापूरमधील ‘सह्याद्री पार्क’ प्रकरणाने हाच अस्वस्थ करणारा प्रश्न नागरिकांसमोर आणला आहे.

नैसर्गिक नाला बुजवून प्लॉटिंग केल्याच्या आरोपानंतर प्रशासनाने पंचनामा केला. त्यानंतर आता या प्रकरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू समोर आला आहे. प्रश्न केवळ नाला बुजविण्याचा नाही, तर ज्या जागेवर नैसर्गिक पाण्याचा प्रवाह असल्याचे लेआउट नकाशातच दिसत आहे, त्याच ठिकाणी प्लॉटिंगला मंजुरी कशी मिळाली? असा सवाल उपस्थित होत आहे.

उपलब्ध लेआउट नकाशानुसार गट क्रमांक १९३, १९४ आणि १९७ मधील जमिनीवर निवासी प्लॉट, ओपन स्पेस आणि अंतर्गत रस्त्यांचे नियोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या संपूर्ण प्लॉटिंगमधून नैसर्गिक जलनिकासीचा मार्ग जात असल्याचे नकाशावर दिसून येते. दोन डझनहून अधिक प्रस्तावित प्लॉट आणि ओपन स्पेसच्या परिसरातून जाणारा हा जलप्रवाह आता चौकशीचा केंद्रबिंदू ठरत आहे.

पावसाचे पाणी शेवटी जाणार कुठे? हा या प्रकरणातील सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. नैसर्गिक नाला हा केवळ नकाशावरील एक रेषा नसतो; तो परिसरातील पावसाचे पाणी वाहून नेणारा नैसर्गिक मार्ग असतो. हा मार्ग बुजविला किंवा अडविला गेल्यास भविष्यात अतिवृष्टीच्या काळात परिसरातील नागरिकांना त्याचा फटका बसण्याची शक्यता असते.

नैसर्गिक नाल्याचा प्रवाह पाइपद्वारे वळविण्यास परवानगी देण्यात आली होती का? असल्यास ती परवानगी कोणत्या प्राधिकरणाने दिली? त्यासाठी कोणत्या अटी व शर्ती घालण्यात आल्या होत्या? लेआउटला मंजुरी देण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली होती का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे, नकाशातच जलप्रवाह दिसत असताना त्याच्या संरक्षणासाठी नेमकी कोणती उपाययोजना करण्यात आली, याचे उत्तर अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे लेआउट तयार करण्यापासून ते विविध स्तरांवरील मंजुरी आणि स्वाक्षऱ्यांपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या प्रकरणात दोष कोणाचा, हे चौकशीतून स्पष्ट होईल. मात्र, नागरिकांच्या मनातील प्रश्न साधा आहेनकाशात नाला दिसत होता, तर मग त्या नाल्याचा नैसर्गिक मार्ग सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी कोणाची होती?

आता प्रशासनाच्या पंचनाम्यानंतर या प्रश्नांची उत्तरे मिळतात का आणि लेआउट मंजुरीच्या प्रक्रियेत नेमके काय घडले, याकडे वैजापूरकरांचे लक्ष लागले आहे.

## निधन वार्ता

### रमेश पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**आश्वी :** आश्वी खुर्द ता. संगमनेर येथील आदिवासी समाजातील रमेश बाळाजी पवार (वय ६४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, एक मुलगी, जावई तिन भाऊ भावजया नातवंडे असा मोठा परिवार आहे. सर्पमित्र म्हणून काम करणारे शिवप्रसाद पवार कृष्णा पवार यांचे वडील तर राजहंस दुध संघात कार्यरत अर्जुन पवार, विजय पवार, शाम पवार यांचे ते बंधु होत.

### सुरेंद्र भांडेकर



**कोल्हार :** कोल्हार बुद्रुक येथील भांड्याचे व्यापारी व विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे पुजारी तसेच राहता तालुका कासार समाज संघटनेचे सदस्य सुरेंद्र भागवत भांडेकर (वय ५८) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, बंधू, पुतणे भावजई असा परिवार आहे.सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र भांडेकर यांचे ते बंधू अक्षय आणि आदित्य भांडेकर यांचे ते वडील होत तर अभिजीत भांडेकर यांचे ते चुलते होत.

# टाकळीभान येथे १५ ऑगस्ट झेंडा फडकवण्याचा मान एकल महिलांना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील एकल महिलांना १५ ऑगस्ट स्वतंत्र दिनाचा झेंडा फडकण्याचा मान मिळणार आहे त्यामध्ये पुढील प्रमाणे एकच महिलांना झेंडा फडकवण्याचा मान टाकळीभान ग्रामपंचायत - मंगल रामकृष्ण जाधव - सुनिता बापुसाहेब चौधरी, तसेच मराठीशाळा - शकुंतला राऊसाहेब पटारे - रंजना राऊसाहेब पवार, त्याचप्रमाणे लक्ष्मीवाडी शाळा - मंगल डॅनियल खरात - आशाबाई रामभाऊ सटाले, आणि बनकर वस्ती शाळा - अनिता बाबासाहेब लोखंडे - अश्विनी रवींद्र म्हस्के, व दाभाडे वस्ती शाळा- सोनाली सागर आसने लांडगे ? - राणी जॉन रणनवरे अशा एकल महिलांना १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचा झेंडा फडकवण्याची संधी पहिल्यांदाच मिळणार आहे त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाचे कौतुक केले जात आहे

# दोन दुचाकींच्या धडकेत दोघे गंभीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** शहरातील लाडगा रोड येथे दोन दुचाकींची धडक होत घडलेल्या भीषण अपघातात दोघे जण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवार ता.१३ रोजी सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास घडली.राहुल जगन्नाथ लिनार (वय ३५ वर्षे) राहणार वैजापूर व चंद्रकांत प्रेमदास प्रजापती (वय २० वर्षे) अशी अपघातील जखमी नावे आहे.या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार राहुल हे दुचाकीने जात असताना त्यांच्या दुचाकीची लाडगाव रोडवर चंद्रप्रकाश यांच्या दुचाकीशी जोरदार धडक झाली.दोघेही अपघातात गंभीर जमिनी झाल्याने दोघांना उपस्थितांनी वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.या घटनेत दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे रेफर करण्यात आले आहे.

# भोकरला भरदिवसा बिबट्याचा शेळ्यांवर हल्ला; एक शेळी फस्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री


भोकरच्या वडजाई शिवारात बिबट्याने भरदिवसा फस्त केलेली शेळी छायाचित्रात दिसत आहे.

**भोकर :** श्रीरामपूर तालुक्यातील भोकर शिवारातील वडजाई परिसरात भरदिवसा बिबट्याने शेळ्यांवर हल्ला करून गाभण शेळीला ऊसाच्या शेतात ओढून नेऊन ठार केले. यावेळी शेळीपासून अवघ्या दहा फुटांवर शेतकरी उभा असल्याने दैव बलवत्तर म्हणून मोठा अनर्थ टळला. बिबट्याला तातडीने जेरबंद करावे, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. भोकर शिवारातील गट क्रमांक १३७ मध्ये शिवाजी आण्णासाहेब वाकडे (वय ५०) हे आपल्या शेळ्या चारत होते. दुपारी सुमारे तीन वाजता ऊसात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक शेळ्यांवर हल्ला केला. त्याने तीन बकरांना जन्म देण्याच्या तयारीतील एका गाभण शेळीला लक्ष्य केले. शेतकऱ्याच्या डोळ्यादेखत सुमारे २५ हजार रुपये किमतीची शेळी ऊसात ओढून नेऊन फस्त केली. घटनेनंतर सुमारे तासाभराच्या प्रयत्नांनी मृत शेळीचा शोध घेण्यात आला. वनविभागाने घटनास्थळी पंचनामा करून सुमारे १४ हजार रुपयांचे नुकसान नोंदविले असून नुकसानभरपाई मिळवून देण्याचे आश्वासन दिले. भोकरसह मुठेवाडगाव रोड परिसरात यापूर्वीही बिबट्याचे दर्शन झाले आहे. त्यामुळे बिबट्या व त्याच्या मादीचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी सुदामराव पटारे, दिलीप पटारे, भाऊसाहेब पटारे, संतोष मते, सिताबाई जगदाळे, मयूर काळे यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# राहुरी कृषी विद्यापीठात ‘बायोहॅप्पीनेस सेंटर’ सहनिर्मिती कार्यशाळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व चेन्नई येथील एम. एस. स्वामीनाथन संशोधन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ‘बायोहॅप्पीनेस सेंटर सहनिर्मिती’ विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते.

डॉ. खर्चे म्हणाले, डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी मांडलेली बायोहॅप्पीनेस संकल्पना पृथ्वीचे कल्याण आणि लोकांची समृद्धी साधणारी शाश्वत प्रणाली आहे. विद्यापीठाच्या ‘फुले समृद्ध गाव’ संकल्पनेतही बायोहॅप्पीनेसचा समावेश करण्यात आला आहे. राहुरी कृषी विद्यापीठ हे राज्यातील पहिले बायोहॅप्पीनेस केंद्र सुरू करणारे विद्यापीठ असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी जमीन, पाणी व मानवी आरोग्य सुधारण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने काम करण्याची गरज व्यक्त केली. डॉ. आर. व्ही. भवानी यांनी शेतकरी, विशेषतः महिला शेतकरी समाधानी झाल्याशिवाय बायोहॅप्पीनेस संकल्पना पूर्ण होणार नसल्याचे सांगितले.

यावेळी राज्यातील विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, शास्त्रज्ञ व अधिकारी सहभागी झाले.

CHANGE OF NAME

Old Name SAYYED JUNED KADAR PATEL
BOARD CERTIFICATE
NEW NAME
SAYYAD JUNED KADAR PATEL
ADHAAR
525734232038

# स्नॅपचॅटवरील ओळख ठरली घातक; १५ वर्षीय मुलीवर अत्याचार

## वैजापूर तालुक्यातील शिऊर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील धक्कादायक घटना; पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** सोशल मीडियावर झालेली ओळख पुढे मैत्रीत आणि त्यानंतर प्रेमसंबंधात बदलल्यानंतर एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना वैजापूर तालुक्यातील शिऊर पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. स्नॅपचॅटच्या माध्यमातून गंगापूर तालुक्यातील एका तरुणाशी तिची ओळख झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी अकरावीच्या वर्गात शिक्षण घेत असून तिचे कुटुंब शेतीवर अवलंबून आहे. स्नॅपचॅटवरून आरोपी तरुणाशी तिची ओळख झाली. त्यानंतर दोघांमध्ये नियमित संवाद सुरू झाल्याने जवळीक वाढली.

आरोपीने मुलीला फिरायला जाण्याच्या बहाण्याने घराबाहेर बोलावले. त्याच्यावर विश्वास ठेवून ती त्याच्यासोबत गेली. त्यानंतर ती काही दिवस घरी परतली नाही. मुलगी बेपत्ता झाल्याने कुटुंबीयांनी शिऊर पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाची तक्रार दाखल केली होती.

मुलगी घरी परतल्यानंतर ती अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत होती. पोलिस ठाण्यात गेल्यानंतरही भीतीमुळे तिने सुरुवातीला काही सांगितले नाही. त्यानंतर महिला पोलिसांनी विश्वासात घेऊन तिचे समुपदेशन केले. यावेळी तिने आपल्यासोबत घडलेली घटना पोलिसांना सांगितली.

तिच्या जबाबानुसार, आरोपीने फिरायला नेण्याच्या बहाण्याने तिला शहरातील एका लॉजवर नेले आणि तेथे तिच्यावर जबरदस्ती केली. या जबाबानंतर पोलिसांनी संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

या घटनेमुळे अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापराबाबत पालकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. मुलांशी विश्वासाचे नाते निर्माण करून सोशल मीडियाचा सुरक्षित आणि जबाबदार वापर, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवादाचे धोके तसेच कोणतीही अडचण आल्यास तत्काळ पालक किंवा विश्वासू व्यक्तीशी संपर्क साधण्याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
| --- | --- | --- | --- |
| १२० ६७० ५८० | ३-६ | २४० २४८ ३९० | जोड ३२-४६-१९-९८-६० |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
| --- | --- | --- | --- |
| १५६ २४६ ६६० | २-५ | १४० २३० १८० | जोड २९-८५-४१-३७-५० |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
| --- | --- | --- | --- |
| १५० २४० ३३० | ६-२ | १२९ ४८० २२८ | जोड ६८-४२-३१-०७-२९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |